## महाराष्ट्र शासन

क्र.विविचा-२००७/प्र.क्र.५१ (भाग-१)/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च,२०१७.

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकास,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि. १६.०३.२०१७ रोजी झालेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी-०७/५५४/१७, दि.१८.०३.२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासासाठी गठित शक्ती प्रदत्त समितीच्या दि. १६.०३.२०१७ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीच्या शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आलेल्या इतिवृत्तास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

आपला,

(सतीश खैरमोडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

O/C

विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.१६/०३/२०१७ रोजी झालेल्या '' शक्ती प्रदत्त समिती''च्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यांत आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची सहावी बैठक दि.१६/०३/२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली विधानभवनातील बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.संजय कुमार | - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग |
| २. | श्री. जमादार | - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग |
| ३. | श्री.एस.एस.झेंडे | - मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ म्हाडा तथा सदस्य सचिव |
| ४. | श्री.सुभाष लाखे | - मा. मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ, म्हाडा |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. त्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचा झालेला निर्णय |
|---|---|---|
| १ | ''शक्ती प्रदत्त समिती- बीडीडी चाळी पुनर्विकास'' च्या चौथ्या व पाचव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | चौथ्या व पाचव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करण्यास सर्वानूमते मान्यता देण्यात आली. |
| २ | वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पूनर्विकास प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागाराच्या नियुक्तीबाबत निर्णय घेणे. | या प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे यांच्या नियुक्तीस तत्वतः मान्यता देण्यात आली तसेच वरळी पुनर्विकास प्रकल्पाबाबत वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे यांनी समितीच्या पुढील बैठकीत सादरीकरण करावे, असे ठरविण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ३ | दि.३०/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने नायगांव व ना.म. जोशी मार्ग-लोअरपरेल येथील पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदा स्वीकृतीचा प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.२३/०३/२०१७ रोजी शक्तिप्रदत्त समितीची सातवी बैठक आयोजित करण्याबाबत विनंती करणे. | सदरील प्रस्तावानुसार दि. २३/०३/२०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता शक्तिप्रदत्त समितीची सातवी बैठक आयोजित करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. |

या चर्चेनंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा
तथा सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
तथा सदस्य / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
तथा अध्यक्ष / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास